- प्रेस नोट - दि.०५/०४/२०२१.

| | |
|---|---|
| | ॲन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १)पुरूषोत्तम कृष्णा वारंग, वय-५२ वर्षे, कनिष्ठ लिपीक तहसीलदार कार्यालय सावंतवाडी, रा.आनंदवन सोसायटी, प्लॅट नं.७ सालईवाडा सावंतवाडी, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग<br>मुळ रा. वारंगाची तुळसुली कालेलकरवाडी, ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग वर्ग-३ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४,०००/-रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ४,०००/-रूपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे पतीला त्यांचे कर्ज प्रकरणाकरीता जामिनदार यांचे ऐपतीचा दाखला आवश्यक असल्याने सदर कर्ज प्रकरणातील जामिनदार यांनी तहसिलदार कार्यालय, सावंतवाडी येथे ऐपतीचा दाखला मिळणेकरीता विनंती अर्ज दाखल केलेला होता. तहसीलदार कार्यालय सावंतवाडी येथे ऐपतीचा दाखला प्रकरणे पाहणारे लिपीक श्री.वारंग यांची तक्रारदार व त्यांचे पती यांनी दिनांक ०१/०४/२०२१ रोजी समक्ष भेट घेतली असता श्री.वारंग यांनी सदरचा दाखला देणेकरीता त्यांचेकडे ४,०००/- रूपयांची लाचेची मागणी केली असल्याबाबतची तक्रार त्यांनी दिनांक ०५/०४/२०२१ रोजी स्वहस्ताक्षरात लिहुन दिली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०५/०४/२०२१ रोजी पंचासमवेत लोकसेवक श्री.वारंग यांची तहसीलदार कार्यालय सावंतवाडी येथे लाचेच्या मागणीसंदर्भात पडताळणी केली असता लोकसेवक श्री.वारंग, लिपीक तहसीलदार कार्यालय सावंतवाडी यांनी तक्रारदार यांचेकडे श्री.राणे यांचा ऐपतीचा दाखला देणेकरीता ४,०००/- रूपयाची लाचेची मागणी करून सदरची रक्कम दुपारी ३ वाजेपर्यंत घेवून या असे सांगितले असल्याचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेल्या संभाषणावरून आढळून आले. सदर पडताळणीच्या अनुषंगाने सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करून लोकसेवक श्री.वारंग, लिपीक तहसीलदार कार्यालय सावंतवाडी यांचेविरूध्द दिनांक ०५/०४/२०२१ रोजी तहसीलदार कार्यालय सावंतवाडी येथे सापळा आजमाविण्यात आला. सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री.वारंग यांनी तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम रूपये ४,०००/- स्विकारल्याने त्यांना दिनांक ०५/०४/२०२१ रोजी १५.३५ वाजता लाच रक्कमेसहीत रंगेहाथ पकडण्यात आलेले आहे.<br>वरील कारवाई श्री.दिपक कांबळे, पोलीस उपअधीक्षक, अेसीबी सिंधुदुर्ग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. नितीन कुंभार यांचेकडून करण्यात आलेली आहे. |

ॲन्टी करप्शन ब्युरो, सिंधुदुर्ग विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास ॲन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- ॲन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग यांचे कार्यालय, कुडाळ,ता.कुडाळ**
**टोल फ्री नंबर:-१०६४,**
**दुरध्वनी क्र.०२३६२-२२२२८९**

05/04/2021

(नितीन कुंभार)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग